REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख १० जुलै, १९४० | अंक २८

## तुम्हांला रोज एक आणा वांचवितां येईल काय?




- नाणें टाकलें तरच चालणारें घड्याळ आम्हीं आमचे विमेदारांस मोफत देतों.
- रोज एक आणा वांचवून तुम्हांस रुपये ५५० पेक्षां अधिक रकमेची पॉलिसी घेतां येईल.
- आमची रद्द झालेली पॉलिसी थकलेले हप्ते अगर व्याज भरावे न लागतां सुद्धां चालू करतां येतें.
- कंपनीनें मागील मूल्यमापनांत विमेदारांस दर हजारीं ३० व २६ असा बोनस जाहीर केला.

**दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲश्यु. कं. लि.** लक्ष्मी रोड पुणें २

अध्यक्ष : श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

शाखा : मुंबई, नागपूर, ग्वाल्हेर, इंदूर, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, बेळगांव, अहमदनगर वगैरे

# BHARAT
## Insurance Co., Ltd.

**COMPLETES IN 1939**

SOLID, SOUND, FRESH BUSINESS of
**OVER RUPEES**
**2 CRORES 8 LAKHS**
UNIVERSALLY RECOGNISED AS
A Leader among Indian Life Offices

*Previous rates of Bonus maintained as a result of the valuation for the quinquennium ended 31st Dec. 1938*

**Rs. 22-8** for Whole-Life Policies

**Rs. 17-8** for Endowment Policies

*Chairman:* SETH RAM KRISHNA DALMIA
*Director-in-Charge:* RAJENDRA KUMAR JAIN

*BRANCHES*

Agra, Ahmedabad, Ajmer, Allahabad, Ambala, Amritsar, Asansol, Bangalore, Barisal, Bombay, Calcutta, Colombo (Ceylon), Dacca, Dehra Dun, Delhi, Ernakulam, Gauhati, Indore, Jalpaiguri, Jammu, Karachi, Lahore, Lucknow, Madras, Madura, Multan, Muzaffarpur, Nairobi (B. Africa), Nagapur, Najibabad, Patna, Peshawar, Poona, Rajmundry, Rangoon (Burma), Rawalpindi, Secunderabad, Shillong, Sialkot, Sukkur, Surat, Karwar

Head Office: LAHORE

## विविध माहिति

### कागद काटकसर अधिकारी

हिंदुस्थान सरकारनें एक पेपर एकॉनॉमी ऑफिसर नेमला आहे. त्यानें हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्यांतील कागदाच्या वापरासंबंधीं काटकसर अंमलांत आणावयाची आहे. तो वेगवेगळ्या कचेऱ्यांस भेट देऊन काटकसरीबाबत हुकूम पाळले जातात किंवा नाहीं ह्याची समक्ष तपासणी करील.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. १० पै व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. १० पै इतका पडला.

### मुंबई बंदराची एक्सपोर्ट ॲडव्हायसरी कमिटी

एक्सपोर्ट ॲडव्हायसरी कौन्सिलनें मुंबई, कलकत्ता, कराची आणि मद्रास ह्या बंदरांकरितां कमिट्या नेमल्या आहेत. कौन्सिलच्या स्थानिक समासदांशिवाय मुंबई येथील कमिटींत खालील समासद असतीलः—मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष आणि सीड्स ट्रेडर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष.

### स्वदेशी साखर—उठाव व शिल्लक

कोणत्याहि मोसमांत तयार होणारी स्वदेशी साखर सर्वच्या सर्व त्याच मोसमांत खपत नसून तिच्यापैकीं कांहीं शिल्लक उरते आणि ती पुढच्या वर्षी खपवावी लागते. यंदाच्या मोसमांत ह्या शिल्लकी मालाचें प्रमाण नेहमीपेक्षा मोठें होईल असा अंदाज आहे. हिंदी साखरेच्या एकूण उत्पादनाच्या तीन चतुर्थांश इतकें उत्पादन असलेल्या १०९ कारखान्यांच्या माहितीवरून गेल्या मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्याचे आंकडे इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या विभागानें प्रसिद्ध झाले आहेत, ते असे आहेतः—प्रारंभीचा शिलकी माल १ कोटि, ७१ लक्ष मण; उत्पादन २ लक्ष ८० हजार मण; मालाचा उठाव ११ लक्ष ७४ हजार मण; कारखान्यांत राहिलेला शिल्लक माल, १ कोटि, ६२ लक्ष मण.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न वाढत आहे

एप्रिल ते २० जून पर्यंतच्या मुदतींत हिंदी रेल्वेजना २३ कोटि, ९६ लक्ष उत्पन्न झालें. गेल्या वर्षीतील ह्याच अवधींतील त्या उत्पन्नापेक्षा हा आकडा २ कोटि, १७ लक्ष रुपयांनीं अधिक आहे.

### हिंदुस्थानांत विमानांचा कारखाना

सरकारनें दरवर्षी ठराविक माल विकत घेण्याची हमी द्यावी आणि उत्पादनास लागणारी यंत्रसामुग्री आणावयास सहाय करावें ह्या अटींवर विमानांचा स्वदेशी कारखाना काढण्याच्या योजनेचा विचार सिमला येथें चालला आहे.

### सिगारेट्सची निर्गत

हिंदुस्थानांतून सिगारेट्सची निर्गत होते, ती बहुतेक ब्रह्मदेशाकडे होते. १९३७-३८ मध्यें हिंदुस्थानानें ७० लक्ष रुपयांच्या २५ लक्ष पौंड वजनाच्या सिगारेट्स निर्गत केल्या.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

सेंट्रल बँकेस ३० जून, १९४० अखेर संपलेल्या सहामाहींत गेल्या वर्षांतून ओढलेली रक्कम मिळवतां, २०,१९,६०५ रुपये नफा झाला. भागीदारांस ह्या सहामाहीबद्दल करमाफ ६% डिव्हिडंड मिळणार आहे.

### युद्धोपयोगी मालाची निर्गत

सध्याच्या युद्धास प्रारंभ झाल्यापासून हिंदुस्थानानें बराच दारूगोळा निर्गत केला आहे. ९ हजार रायफली, ८½ हजार तंबू, ४५ लक्ष वाळूचीं पोतीं, ६ लक्ष वार ब्लँकिटें, १० लक्ष वार खाकी कापड, १½ लक्ष बूट जोड्या, १७ हजार घोड्यांचीं जिनें, इत्यादि मालहि ह्या मुदतींत बाहेर गेला आहे.

### फ्रेंचांस ब्रिटिश नागरिकत्वाचा दर्जा

दोस्त राष्ट्रांच्या पक्षास सहाय करणाऱ्या फ्रेंच नागरिकांस ब्रिटिश नागरिकत्वाचा दर्जा प्राप्त करून देणें शक्य तेवढें सुलभ व्हावें, असा प्रयत्न ब्रिटिश सरकार करीत आहे.

### चालू बँक रेट

| | | |
|---|---|---|
| रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाः २८ नोव्हेंबर, १९३५ पासून | | ३% |
| बँक ऑफ इंग्लंडः २६ ऑक्टोबर, १९३९ पासून | | २% |
| फेडरल रिझर्व्ह बँक (अमेरिका): २६ ऑगस्ट, १९३७ पासून | | १% |
| बँक ऑफ फ्रान्सः ३ जानेवारी, १९३९ पासून | | २% |

### फ्रँक

फ्रेंच फ्रँकचें नातें ब्रिटिश पौंडाऐवजी अमेरिकन डॉलरशी जोडण्यांत आलें आहे, असें जर्मन रेडिओनें जाहीर केलें आहे.

### युद्ध फंडाकरितां एका दिवसाचा पगार

"दरमहा १०० रुपयांपेक्षा अधिक पगार असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं प्रत्येक महिन्यास एका दिवसाच्या पगाराइतकी रकम सहा महिनेपर्यंत युद्धफंडास द्यावी, अशी सरकारची इच्छा आहे. ह्यांत सक्तीचा भाग नाहीं. गव्हर्नरांपासून खालपर्यंतच्या अधिकाऱ्यांनीं एका दिवसाचा पगार देण्याचें योजिलें आहे." मद्रास येथील नागरिकांच्या सभेस उद्देशून त्या प्रांताच्या गव्हर्नरांनीं भाषण केलें, त्यांत वरील उद्गार त्यांनीं काढले.

### बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९४० च्या पहिल्या सहामाहींत, मागील वर्षांतून ओढलेली रकम धरून, १८ लक्ष, ५१¾ हजार रुपये नफा झाला. त्यांतून बँकेच्या भरणा झालेल्या १ कोटि रुपयांच्या भांडवलावर ११% करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत आलें.

### हिंदी युद्ध कर्जे

२८ जून अखेरपर्यंत हिंदी युद्धकर्जास खालीलप्रमाणें रकमा मिळाल्याः—

| | |
|---|---|
| बिनव्याजाचे डिफेन्स बॉन्ड्स | ७१ लक्ष रु. |
| ३% डिफेन्स बॉन्ड्स | २८¾ लक्ष रु. |
| पो. ऑ. १० वर्षांचीं डिफेन्स सर्टिफिकिटें | १७¾ लक्ष रु. |

### तीन गिरण्या बंद

मुंबईच्या कपास कापडाच्या गिरण्यांचे मालास पुरेशी मागणी नाहीं, त्यामुळें तेथील सहा गिरण्यांनीं रात्रपाळी बंद केली असून तीन गिरण्या बंद पडण्याचा संभव आहे.

### बँकिंग विषयक कायदा

एकंदर परिस्थिति निवळेपर्यंत बँकिंग विषयक कायदा करण्याचें काम तहकूब ठेवावें, अशी सूचना फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीच्या कमिटीनें हिंदुस्थान सरकारास केली आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३२६ |
| २ नाण्यांच्या टंचाईचें कारण नाहीं ... | ३२७ |
| ३ कागदाचा तुटवडा | ३२८ |
| ४ स्फुट विचार ... | ३२९ |
| अमेरिकन संडाशीं हिंदुस्थानचा व्यापार—फ्रेंच आरमार ब्रिटिशांच्या हातीं आलें—नवें धोरण अभिनंदनीय आहे—सहकारी नियमांत नवीन नियमाची भर—ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.—सदर्न निटिंग वर्क्स लि. | |
| ५ दारूबंदीच्या प्रयत्नातील अडचणी ... | ३३१ |
| ६ न्यूझीलंड ... | ३३२ |
| ७ ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि. ... | ३३३ |
| ८ मुंबई प्रांतांत शेती सुधारणेचे प्रयत्न | ३३३ |
| ९ निवडक बाजारभाव | ३३४ |
| १० कांहीं सेडेगांवी धंदे | ३३५ |



# अर्थ

बुधवार, ता. १० जुलै, १९४०


## नाण्यांच्या टंचाईचें कारण नाहीं

मामुली व्यवहारांस लागणारें नाणें रिझर्व्ह बँकेजवळ असून तें लोकांस लागेल तेव्हां व तसें मिळावें ह्या बेतानें तें तिनें खेळतें ठेवलें आहे. सध्या अडचण उत्पन्न झाली आहे ती धूर्त लोकांच्या कारवाया, भित्र्या लोकांची फाजील सावधगिरी आणि अडाणी जनतेचा भोळसरपणा ह्यांच्या समुच्चयाचे योगानें उद्भवली आहे. कागदांच्या नोटांपेक्षा धातूंच्या नाण्यांत अधिक भरींवपणा व स्थैर्य असतें ह्या समजुतीनें युद्धाच्या अफवा ऐकून अप्रबुद्ध व सामान्य बुद्धीचीं माणसें रुपये, अधेल्या व पावल्या संग्रहीं ठेवूं लागतात. त्यामुळें लहान-मोठ्या नाण्यांस फाजील मागणी येते आणि नोटा व्यवहारांतून जाऊं लागतात. नोटा बदलून घेण्याचें हें वेड निष्कारण पसरतें आणि नाण्यांच्या पुरवठ्यावर विलक्षण ताण पडतो. सामान्य जनतेंत भलतीच भीति पसरण्यांत ह्या प्रवृत्तीचा परिणाम होतो आणि भीति व नाण्यांची टंचाई आणि नाण्यांची टंचाई व भीति अशा कार्यकारण परंपरेचें चक्र चालू रहातें. स्वार्थसाधू मंडळी ह्या परिस्थितीचा फायदा घेतात आणि बट्टा कापून घेऊन नोटांच्या बदला नाणें देतात. गेल्या महायुद्धांत ह्या प्रकारच्या कारवाया मोठ्या प्रमाणावर चालल्या होत्या. अडाणी व घाबरट मंडळीकडून स्वस्तात नोटा घ्यावयाच्या, त्यांचे करन्सी ऑफिसांत रोकड रुपये करावयाचे आणि मधल्या फरकाचा फायदा मारावयाचा हा कांहीं जणांचा किफायतशीर धंदाच जणूं काय बनला होता. त्यावेळीं सरकारनें कोट्यवधि रुपये टांकसाळींत पाडून प्रचलित केले, पण ते व्यवहारांत उपयोगी न पडतां साठवणींत गडप होऊं लागले, चांदी महाग व दुर्मिळ झाली आणि नाण्यांचा भयंकर तुटवडा पडला. चालू युद्धांत अशा प्रकारची टंचाई होण्याचें मुळींच कारण नाहीं. चांदीचा किंवा नाण्यांचा वास्तविक तुटवडा नाहीं. परंतु मागच्या युद्धाच्या वेळीं आलेल्या अनुभवापासून जनतेनें बोध घेणें अगत्याचें आहे. व्यवहारांत लागणाऱ्या नाण्यांचा भरपूर पुरवठा झाला म्हणजे कार्यभाग उरकला पाहिजे ह्या मर्यादेबाहेर नाणें मागण्याचें कोणासहि कारण नाहीं आणि जरूरीपेक्षां अधिक नाण्याची मागणी करणारे लोक समाजाचें व पर्यायानें स्वतःचें नुकसान करतात हें ध्यानांत बाळगलें पाहिजे.

युद्धपरिस्थितींत नाण्यांचे बाबतींत गडबड उडते हें जाणून जरूरीपेक्षा अधिक नाण्यांची मागणी कोणीहि करूं नये असें हिंदुस्थान सरकारनें जनतेस बजावलें होतें आणि असें सामाजिक हितास बाधक कृत्य करणें गुन्हा ठरेल असें प्रसिद्धहि केलें होतें. ह्याप्रमाणें नोटांचे बदली योग्य मर्यादेंत रुपये देण्याची तजवीज रिझर्व्ह बँकेनें केली ती अपुरी ठरली आहे. नाण्यांची काटकसर करण्याच्या सरळ बुद्धीनें त्यांची देवघेव हात राखून करण्याचा प्रयत्न सर्वत्र होऊं लागला, ह्यामुळें आणि वर नमूद केलेल्या कारणसमुच्चयाच्या योगानें नाण्यांची कृत्रिम टंचाई उत्पन्न झाली. मुंबईस रिझर्व्ह बँकेच्या कचेरींत नोटा देऊन रुपये घेऊं इच्छिणाऱ्या लोकांची गर्दी होऊन गेल्या आठवड्यांत कित्येकांस तासच्या तास तिष्ठत बसावें लागलें आणि लहान-मोठें नाणें मिळत नसल्याची तक्रार अनेक ठिकाणीं ऐकूं येऊं लागली. मागणारांस नाणीं देण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँक कसून करीत आहे. पण तीं मिळण्यांत अनुभवास आलेली गैरसोय व त्रास ह्यांचा परिणाम अनपेक्षित रीतीनें प्रतिकूल झाला आहे. नाण्यांची टंचाई होणार ह्या समजुतीनें तीं न खर्चण्याची आणि मिळाल्यास तीं जवळ ठेवण्याची प्रवृत्ति लोकांमध्यें वाढते आणि नित्याच्या व्यवहारांत ज्यांस मोठ्या प्रमाणांत नाणीं हाताळावीं लागतात त्यांस तीं पुरेशीं वेळेवर मिळत नाहीत, अशी ही गुंतागुंतीची परिस्थिति निर्माण झाली आहे. पन्नास कोटि रुपयांच्याखाली त्यांची एकूण रकम गेल्यास पांच कोटि रुपये विशिष्ट परिस्थितींत रिझर्व्ह बँकेस देण्याची जबाबदारी त्या बँकेच्या कायद्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारवर टाकलेली आहे. नाणीं पाडण्याचा अधिकार त्या सरकारचा आहे, रिझर्व्ह बँकेस स्वतः रुपये पाडतां येत नाहींत. रुपये पुरविण्याची ही व्यवस्था मामुली स्थितीसाठी आहे. अडचणीच्या प्रसंगीं सरकारास बँकेस जादा रुपये पुरवतां येतील. त्यासाठी चांदीची वाण नाहीं आणि टांकसाळी कार्यक्षम आहेत. तथापि प्रश्न आहे तो व्यवहारांस आवश्यक असलेलें लहान-मोठें नाणें पुरवण्याच्या तजवीजीचा आणि खरोखर जरूर नसलेलीं नाणीं काढण्यांत व पुरवण्यांत चांदी व श्रम ह्यांचा दुरुपयोग होतो, त्यावर उपाय काढण्याविषयींचा आहे.

रिझर्व्ह बँकेनें मुंबईत लहान-मोठीं नाणीं देण्यासाठी क्रॉफर्ड मार्केट व इतर बाजार ह्यांचे ठिकाणीं खास व्यवस्था केली आहे. त्याचप्रमाणें, पोस्ट ऑफिसें, रेल्वेज व बँका ह्यांसहि गिऱ्हाइकांचे सोयीसाठी नाणीं पुरविलीं जात आहेत. ह्या कारणानें रिझर्व्ह बँकेच्या स्वतःच्या कचेरीवर पडणारा ताण आतां कमी होऊन जनतेमध्यें विश्वासाचें वातावरण पसरण्यास सहाय होईल. प्रस्तुत युद्ध चालू झाल्यापासून रिझर्व्ह बँकेनें सुमारें जादा ४० कोटि रुपये व्यवहारांत पुरवले आहेत आणि त्या रकमेनें तिचा रुपयांचा संग्रह घटला आहे. तथापि, रुपये आणि नाणीं पुरवण्याचें सामर्थ्य तिच्यापाशीं भरपूर आहे ही गोष्ट नाणीं देण्याची तिनें मुंबईत खास जादा सोय केली आहे ह्यावरून स्पष्ट होत आहे. तरीहि नाण्यांची जी तात्पुरती व कृत्रिम टंचाई उडाली तिच्या संबंधांत विशेष सावधगिरी तिनें वेळींच बाळगली असती तर बरें झालें असतें, ह्या टीकेंत पुष्कळ तथ्य आहे. नाण्यांचा दुरुपयोग करणारांविरुद्ध कडक उपाय योजण्याचें धोरण सरकारनें अंमलांत आणावें ह्या संबंधांत लोकमत पूर्णपणें अनुकूल आहे आणि ह्या-

बाबतींत जनतेचा त्यास हार्दिक पाठिंबा मिळेल. परंतु आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें मागील महायुद्धांतल्या अनुभवापासून योग्य बोध घेतला जाणें आवश्यक आहे. एक रुपयाच्या चलनी नोटा ह्या पूर्वीच प्रचलित केल्या जाणें ह्या दृष्टीनें जरूर होतें. गेल्या महायुद्धाचे वेळीं ह्या नोटा चांगल्या लोकप्रिय झाल्या होत्या आणि त्या सामान्य व्यवहारांतील देवघेवींमध्यें निर्वेधपणें खेळत होत्या. त्या आज प्रचलित असत्या तर पांच किंवा दहा रुपये किंमतीच्या नोटांच्या मोडीचा प्रश्न सोपा झाला असता. एक रुपयाच्या नोटा हाताळल्यानें लवकर खराब होऊन त्यांच्या जागीं नवीन नोटा पुन्हां पुन्हां वारंवार काढाव्या लागतात आणि हें काम रुपयांच्या नाण्याचे मानानें खर्चीचें होतें ह्या मुद्यावर त्या बंद करण्यांत आल्या. पण ही काटकसर दूरदर्शीपणाची नव्हती हें त्यावेळीं प्रदर्शित झालेलें पण मान्यता न मिळालेलें मत आतां कटु अनुभवानें खरें ठरलें आहे. लहानमोठ्या किंमतीच्या नोटा वापरण्याची सवय जनतेंत जितकी पसरेल आणि दृढ होईल, तितकें इष्ट आहे.

## कागदाचा तुटवडा

स्टेशनरी सामानाच्या, विशेषतः कागदाच्या, खपामध्यें काटकसर घडवून आणण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें खास अधिकारी नेमला असून आपल्या निरनिराळ्या खात्यांमध्यें कागदाचा वापर मर्यादित करण्याचा प्रयत्न चालवला आहे. ह्या देशांत स्वदेशी गिरण्यांत कागद तयार होतो त्यास भरपूर मागणी आहे आणि सर्व जातींचा कागद पुरवणें त्यांस शक्य नाहीं. वृत्तपत्रांसाठी उपयोगांत आणला जाणारा कागद तर आतां दुर्मिळ झाला आहे आणि त्याच्या वापरांत काटकसर झाल्यावांचून गत्यंतर नाहीं. ग्रेटब्रिटनमध्यें वृत्तपत्रांनीं आपलीं पानें कमी केलीं आहेत आणि इतर मार्गांनीं त्यांनीं वापरावयाच्या कागदास कात्री लावली आहे. त्या देशांत कागदाच्या वापरावर सरकारी नियंत्रण आहे आणि त्याच्या किंमतीहि वेळोवेळ अधिकारी रीतीनें निश्चित केल्या जातात. वृत्तपत्रांसाठी उपयोगावयाच्या कागदाची किंमत त्या देशांत नुकतीच वाढवण्यांत आली आहे आणि चालू महिन्याच्या प्रारंभापासून ती दर टनास २४ पौंड करण्यांत आली आहे. कागदाचा उपयोग राखून केला जावा ह्या उद्देशानें ह्याप्रमाणें दर चढवण्यांत आला आहे. युद्धकाळांत वर्तमानपत्रांचें महत्त्व किती आहे हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. जनतेस खऱ्या बातम्या पुरवून लोकांची मनःस्थिति उत्साहाची व निश्चयाची राहील असें लिखाण लिहून वृत्तपत्रांस युद्धकार्यास चांगलें सहाय देतां येतें. ह्या दृष्टीनें त्यांस कागदाचा पुरवठा व्यवस्थित रीतीनें होईल अशी व्यवस्था करणें म्हणजे युद्धाचा कार्यक्रम यशस्वी होण्यास हातभार लावणेंच होय. तथापि, युद्धास युरोपांत जे फाटे फुटले आहेत, त्यांचे योगानें वृत्तपत्रीय कागदाच्या कच्च्या मालाचा उगम बंद झाल्यासारखा आहे. लाकडाचा रांधा ब्रिटिश कागदाच्या गिरण्यांत वापरण्यांत येतो तो नॉर्वे, स्वीडन ह्या देशांतून येणें कठीण झाल्याकारणानें त्यास कॅनडा व न्यू फौंडलंडचा लाकडा पल्ला गाठणें प्राप्त आहे. अशी परिस्थिति उपस्थित होणार अशी कल्पना करून दूरदर्शीपणानें ब्रिटिश सरकारनें तिला तोंड देण्याची तरतूद योग्य वेळीं करावयास हवी होती असें कांहीं पत्रें इंग्लंडमध्यें म्हणत आहेत. जोडा कोठें चावतो हें त्यांस अनुभव समजत असल्यामुळें त्यांची टीका योग्य आहे असें मानलें तरी आलेल्या प्रसंगावर उपाय शोधून काढण्यांत शहाणपणा आहे, काय केलें असतें तर काय झालें असतें ह्याचा विचार करण्यांत अर्थ नाहीं.

वृत्तपत्रीय कागदाच्या पुरवठ्याचे संबंधांत परिस्थिति काय आहे ह्याविषयींची थोडी माहिती येथें आम्हीं देत आहों. कागदाच्या ब्रिटिश गिरण्या स्वीडन, नॉर्वे व फिन्लंड यांवर बहुतेक सर्वस्वी अवलंबून, त्या बाजूनें येणारा लाकडाचा रांधा वापरीत आल्या आहेत. लॉर्ड नॉर्थक्लिफ ह्यांनीं दूरदर्शीपणानें न्यूफौंडलंडमध्यें मोठ्या प्रमाणांत लाकडाच्या रांध्याची गिरणी स्थापली ती आतां ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत आहे. मि. बोवाटर ह्यांनीं आपल्या इंग्लंडमधील एका गिरणीस भरपूर रांधा मिळेल ह्या बेतानें दोन कोटि रुपये खर्चून अशीच व्यवस्था केली. स्कँडेनेव्हियांतून इंग्लंडला लाकडाचा तयार रांधाच येत असे आणि त्याचा टिकाऊपणा मर्यादित मुदतीचा असे. ह्याच्या उलट, न्यू फौंडलंडमधून रांधा बनवण्यास योग्य अशा लाकडाचे चार फुटी तुकडे आणण्यांत येत असत. ते दीर्घकालपर्यंत टिकून त्यांचा रांधा ग्रेटब्रिटनमध्यें तयार करण्यांत येई. प्रस्तुत युद्धास प्रारंभ झाला तेव्हां स्कँडेनेव्हियामधून येणारा सर्व रांधा एकत्रित करून गिरण्यांस विशिष्ट प्रमाणांत वाटून देण्याचा उपक्रम ब्रिटिश सरकारनें केला. न्यू फौंडलंडमध्यें लाकडाचे कोट्यवधि ओंडके सहज मिळण्यासारखे होते, ते आणून साठवण्यांत आले असते, तर स्कँडेनेव्हियन रांध्याची आयात बंद झाल्यानें कागदाचा तुटवडा आज पडला आहे, तो टळला असता. परंतु नॉर्वे व स्वीडन ह्या देशांतून रांध्याचीं जहाजें शत्रूच्या हल्ल्यामुळें बुडूं लागलीं आणि ह्या रांध्याची जागा भरून काढण्यास न्यू फौंडलंडमधून लाकडाचा पुरवठा होऊं शकला नाहीं. स्कँडेनेव्हिअन रांधा नॉर्वे व स्वीडन ह्यांच्या जहाजांमधून येत होता. न्यू फौंडलंडमधून लाकडाचे ओंडे आणण्यास लागणारा जहाजांचा पुरवठा सहज होणें शक्य नव्हतें. ह्यामुळें ओंड्यांचा साठा करण्यांत आला नाहीं आणि स्कँडेनेव्हिअन रांधा आयात होणें अशक्य झालें. ब्रिटिश दैनिक वृत्तपत्रांनीं चार लक्ष टन इतका आपल्या उपयोगाचा कागद कॅनडामधून आणण्याची परवानगी सरकाराजवळ मागितली आणि ती देण्यांत आली. ह्या योगानें वृत्तपत्रांची अडचण थोडी कमी झाली. त्यांस दर वर्षास १२ लक्ष टन कागद लागतो. तथापि काटकसरीनें वापरल्यास जरूरीपुरता कागद मिळण्याची त्यांची सोय झाली. परंतु साप्ताहिकें व इतर नियतकालिकें ह्यांस कागदाचा तुटवडा जाणवत आहे. सरकारनें आपणांस सहाय देऊन ह्या बाबतींतलें आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. कॅनडामधील गिरण्यांच्या कागदास पुष्कळच मागणी येणार असून त्याची किंमतहि चढल्यावांचून रहावयाची नाहीं. ह्या साम्राज्यांतर्गत पुरवठ्याचा पुरेसा अंश इंग्लंडमधील पत्रांस मिळेल अशी व्यवस्था ब्रिटिश सरकारनें तातडीनें करावी असें त्यांनीं आग्रहानें सुचवलें आहे.

---

### पेट्रोलच्या दरांत वाढ

१ जुलैपासून पेट्रोलची किंमत गॅलनास एक आणा प्रमाणें वाढली आहे. ही वाढ हिंदुस्थान सरकारच्या संमतीनें झाली आहे. युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी मुंबईंत पेट्रोलचा दर १ रु. १ आ. होता, तो आतां १ रु. ८ आ. झाला आहे. सेल्स टॅक्सचा १ आणा आणखी द्यावा लागतो.

# स्फुट विचार

## अमेरिकन खंडाशीं हिंदुस्थानचा व्यापार

हिंदुस्थानच्या निर्गत व्यापारास युरोपांतील देशांचे बाजार युद्धामुळें बंद झाले आहेत. शत्रु राष्ट्रांची तर गोष्टच बोलावयास नको, पण त्या बाजूच्या तटस्थ राष्ट्रांशींहि ह्या देशाचा व्यापार चालणें आतां अशक्य झालें आहे. हिंदुस्थानचे पश्चिमेच्या बाजूचें नेहमीचें मोठें गिऱ्हाइक इंग्लंड हें होय आणि त्या देशांत आमचा माल खपतहि आहे. जरूरीची युद्धसामुग्री इंग्लंड हिंदुस्थानांतून घेत आहे. तथापि युरोपांतल्या इतर देशांत हिंदी माल जाणें बंद झाल्याकारणानें सुमारें ३० कोटि रुपयांनीं आमचा निर्गत व्यापार घटणें अपरिहार्य आहे. ग्रेट ब्रिटन आणि ब्रिटिश वसाहती ह्यांमध्यें हिंदी निर्गतीचा निम्मा भाग जात असला तरी वरील घट भरून काढण्यास हिंदुस्थानास दुसऱ्या बाजारपेठा शोधणें आवश्यक आहे. पूर्वेकडे जपान आणि पश्चिमेच्या बाजूस अमेरिका ह्यांचेवर हिंदी निर्गत व्यापाराची आतां भिस्त आहे. लढाऊ सामानाच्या बनावटींची तयारी हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणांत चालली असून तिचेसाठी बराच माल अमेरिकेच्या बाजूनें इकडे यावा लागेल. त्याच्या मोबदल्यांत हिंदी माल तिकडच्या बाजारांत खपला जाणें अगत्याचें आहे. हिन्दी निर्गत व्यापार घटल्यास हुंडणावळीची अडचणहि उपस्थित होण्याचा संभव आहे. तेव्हां हिन्दी आयात-निर्गत व्यापाराची घडी नीट बसण्यास अमेरिकन खंडांत आमचा व्यापार वाढला पाहिजे हें उघड आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन डॉ. ग्रेगरी, आर्थिक सल्लागार आणि सर डेव्हिड मीक, लंडनमधील हिंदुस्थानचे व्यापारी प्रतिनिधि, ह्यांस अमेरिकेंत तातडीनें पाठवण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें आहे. उत्तर व दक्षिण अमेरिकेंतील देशांत हिंदुस्थानचा निर्गत व्यापार कसा वाढेल ह्या विषयींची चौकशी करून व्यवस्था त्यांनीं सुचवावयाची आहे. निर्गत व्यापारासंबंधानें सल्ला देण्यासाठी सरकारनें समिती नेमली आहे. तिच्या सप्टेंबरमध्यें मुंबई येथें भरणाऱ्या सभेंत ते व्यापार-वृद्धिविषयीच्या आपल्या सूचना पुढें मांडतील अशी अपेक्षा आहे.

---

## फ्रेंच आरमार ब्रिटिशांच्या हातीं आलें

फ्रान्समध्यें हिटलर पाय पसरून बसल्यामुळें फ्रेंच सरकाराची सत्ता केवळ नाममात्र आहे. युद्धतहकुबी होऊन तहाच्या अटींच्या वाटाघाटी फ्रेंच व जर्मन प्रतिनिधींच्या मध्यें चालू आहेत. त्यांचा निकाल कांहीं लागला तरी फ्रेंच लोकांस त्यांचें स्वातंत्र्य हिटलरच्या हातून परत मिळणें शक्य नाहीं. त्यानें बोलण्यांत कितीहि साखर पेरली तरी आपल्या हातीं सापडलेलें फ्रेंच राष्ट्र तो सोडून देण्यांस कधींहि तयार होणार नाहीं. फ्रेंच राष्ट्राचीं नखें व दात काढून घेऊन त्याचा प्रदेश जर्मनीनें मोकळा केला तरी फ्रेंचांचें परावलंबन आतां चुकत नाहीं. फ्रेंच राज्य-घटना बदलण्याची भाषा फ्रान्समधील सध्याचे राज्यकर्ते बोलूं लागलेच आहेत. ह्यावरून फ्रान्समध्यें राजकीय वारा कसा वाहात आहे ह्याची चांगली कल्पना येते. फ्रेंच आरमाराचा उपयोग ब्रिटिशांचे विरुद्ध आपण करणार नाहीं असें आश्वासन जर्मनीनें दिलें असल्याचें प्रसिद्ध झालें होतें. परंतु सत्यप्रियतेविषयीं हिटलरची ख्याति नाहीं आणि आतांपर्यंत त्यानें अनेक वेळां केलेल्या वचनभंगाचा जगास अनुभव आलेला आहे. तसेंच फ्रान्समधील जनता व सरकार हीं उघड उघड हतबल झालेलीं आहेत. इकडे, इंग्लंडवर स्वारी करण्याची हिटलरनें जोराची तयारी चालवली आहे. अशा स्थितींत फ्रेंच आरमार जर्मन सत्ते-खालीं राहूं देण्यांत इंग्लंडला भयंकर धोका आहे. त्या आरमाराचा उपयोग ब्रिटिशांविरुद्ध करण्यास हिटलर मागेंपुढें पहाणार नाहीं. त्याच्या आश्वासनावर विसंबून रहाणें वेडेपणाचें ठरलें असतें. ह्या दृष्टीनें पहातां ब्रिटिश सरकारानें आपल्या बंदरांतील, उत्तर आफ्रिकेच्या फ्रेंच बंदरांतील व अलेक्झांड्रिया येथें असलेलीं फ्रेंच लढाऊ जहाजें स्वतःच्या ताब्यांत घेण्यांत जी धडाडी दाखवली ती स्तुत्य आहे. परवां, परवांपर्यंत दोस्तींनें लढणाऱ्या मित्र-राष्ट्राचें आरमार जरूरीप्रमाणें त्याच्या अधिकाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध लढूनहि आपल्या ताब्यांत घ्यावें लागलें ह्याबद्दल मि. चर्चिल ह्यांनीं खेद प्रदर्शित केला. पण जेथें फ्रेंच राष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट झालें तेथें त्याच्या आरमारी अधिकाऱ्यांस तरी खरी सत्ता कोठें उरली? फ्रेंच सरकार सध्या लाचार झालें असून त्यास हिटलरच्या धोरणानेंच वागणें प्राप्त आहे. ह्या कारणानें ब्रिटिशांनीं फ्रेंच आरमारावर केलेला आघात हा वस्तुतः जर्मनीवर केलेला हल्लाच होय आणि ह्या कामांतला त्यांचा विजय हिटलरवर मिळविलेला विजय आहे.

---

## नवें लष्करी व आर्थिक धोरण अभिनंदनीय आहे

'उत्कट इच्छा असली म्हणजे मार्ग सापडतो' अशी एक इंग्रजी म्हण आहे, तिची आठवण, लष्करी शिक्षण व उद्योगधंद्यांचें संवर्धन ह्यांचे बाबतींत हिंदुस्थान सरकार धडाडीचें धोरण अवलंबीत आहे, हें पाहून सहज होते. ह्या देशाच्या संरक्षणाची कार्यक्षम व्यवस्था होण्यासाठी विस्तृत प्रमाणावर लष्करी शिक्षणाची तजवीज होऊन सैन्याच्या सर्व शाखांमध्यें अधिकाराच्या जागांवर हिंदी तरुणांची नेमणूक करतां येईल अशी योजना सरकारनें निश्चयानें व उत्साहानें हातीं घ्यावी ह्या आशयाच्या सूचना हिंदी पुढारी आज कित्येक वर्षें करीत आहेत. लष्करी पेशाचे लोक विशिष्ट जाती व जमाती ह्यांचेमधूनच न निवडतां सर्व प्रांतांतून व सर्व वर्गांतून घेतले जावे आणि शिकाऊ तरुणांस फौजेंत कमिशनें सढळ हातांनीं दिलीं जावीं असेंहि सुचवण्यांत आलें आहे. परंतु लायक माणसें मिळत नाहींत, कमिशनच्या जागा मर्यादित आहेत, इत्यादि कारणें पुढें येऊन हिंदी सैन्याचें हिंदीकरण लांबणीवर पडत चाललें आहे. तथापि आतां युद्धपरिस्थिति आणीबाणीची झाल्यामुळें देशाच्या संरक्षणासाठी हिंदी पुढाऱ्यांनीं वर्षानुवर्ष केलेल्या सूचना सरकारास पटल्या आहेत. उशीरा कां होईना, प्रस्तुत प्रकरणीं सरकारचें धोरण इष्ट दिशेनें बदललें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. लष्करी शिक्षण संस्थांमध्यें दरवर्षी पन्नास अधिकारी शिकून तयार होत होते, त्यांचे जागीं आतां अकराशे लोकांची सोय होणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनाची गोष्ट अशीच आहे. दारूगोळा आणि शस्त्रास्त्रें ह्यांचें उत्पादन ह्या देशांत झपाट्यानें वाढत असून हिंदुस्थानचें ह्या बाबतींतलें सामर्थ्य आतां एवढें मोठें झालें आहे कीं, लढाऊ सामुग्रीचा पुरवठा देशाबाहेर आवश्यक ठिकाणीं पाठवण्याची त्याची पूर्ण तयारी आहे. लढाऊ जहाजें आणि विमानें ह्या देशांत बांधण्याच्या तयारीची भाषा बोलली जात आहे ह्यावरून या प्रगतीच्या दिशेची कल्पना येण्यासारखी आहे. हिंदुस्थानच्या सुप्तावस्थेंतील व बीजरूपांतील आर्थिक सामर्थ्य, जागरूकता आणि योजकता ह्यांचे योगानें फळास येण्यांत ह्या देशाचा व इंग्लंडचा सारखाच फायदा आहे. लष्करी व आर्थिक प्रगतीच्या नवीन योजनांचें हिंदी जनतेकडून मनःपूर्वक स्वागत झाल्यावांचून रहाणार नाहीं.

### सहकारी कायद्याखालील नियमांत नवीन नियमाची भर

मुंबईच्या सहकारी कायद्याच्या १३ व्या कलमामध्यें कोणत्याहि सहकारी संस्थेची खास साधारण सभा भरविण्याविषयींचा हुकूम देण्याचा अधिकार रजिस्ट्रार ह्यांस दिलेला आहे. विशिष्ट महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी व्यवस्थापक मंडळानें स्वतःच्या मतानें किंवा सभासदांच्या ठराविक संख्येच्या सूचनेवरून अशी सभा बोलावण्याची तेथें तरतूद आहे आणि जरूर वाटल्यास विवक्षित बाबींच्या चर्चेसाठी रजिस्ट्रारच्या सल्ल्यावरूनहि ही खास सभा भरली पाहिजे असें त्या कलमांत म्हटलें आहे. ही तरतूद कायद्यानें करण्याचा उद्देश स्पष्ट आहे. परंतु साधारण सभेमध्यें व्हावयाचीं कार्यें खास सभेंत होणार नाहींत आणि तीं होण्यास अवसर मिळेल अशी कांहीं तरी व्यवस्था अपवादात्मक परिस्थितीकरितां असणें आवश्यक आहे. एकाद्या संस्थेंत साधारण सभा भरली नाहीं आणि तिनें करावयाचीं कामें अडून पडलीं तर काय करावें असा प्रश्न उपस्थित होतो. त्याच्या समाधानार्थ भणसाळी-मेथा कमिटीनें असें सुचवलें होतें कीं, कायद्याच्या १३ व्या कलमांत दुरुस्ती करावी आणि रजिस्ट्रारनीं सांगितल्यावरून भरलेल्या खास सभेंत साधारण सभेचींहि कामें करतां यावी अशी तेथें तजवीज केली जावी. ह्या सूचनेच्या अनुरोधानें मुंबई सरकारनें सहकारी कायद्याखालील नियमांत ६ अ असा नियम करण्याचें योजलें असून त्याचा मसुदा गॅझिटांत प्रसिद्ध केला आहे. प्रांतिक सहकारी बँकांच्या मंडळानें ( बॉंबे कोऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें ) ह्या नियमांतील दोष सरकारच्या निदर्शनास आणून सध्याच्या स्वरूपांत तो कायम करूं नये असा आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. नियोजित नवीन नियमांत खास सभा भरवण्याचे बाबतींत, तिची जागा, वेळ वगैरे संबंधांत रजिस्ट्रारना जरूरीपेक्षा ज्यास्त अधिकार देण्यांत येत आहेत असा असोसिएशनचा आक्षेप आहे. भणसाळी-मेथा रिपोर्टांतील शिफारसीच्या मर्यादेबाहेर जाऊन रजिस्ट्रारना वाटेल तेथें व वाटेल तेव्हां खास सभा बोलावण्याचा अधिकार देण्याची जरूर नाहीं. त्यांनीं बोलावलेल्या सभेंत त्यांच्या इच्छेप्रमाणें विशिष्ट प्रश्न विचारांत घ्यावयाचे, त्यांचे बरोबरीनें सामान्य साधारण सभेंत व्हावयाची कामेंहि सभेनें करण्याची मुभा असावी एवढीच दुरुस्ती वास्तविक हवी आहे. त्याच्या पलीकडे जाऊन सहकारी संस्थांचे अधिकार मर्यादित करण्याचें आणि रजिस्ट्रारवर ज्यादा जबाबदाऱ्या टाकण्याचें प्रयोजन नाहीं. असोसिएशनच्या अभिप्रायाचा सहानुभूतिपूर्वक विचार सरकार करील अशी आम्हांस आशा आहे.

---

### ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.

या कंपनीचा चवथ्या वर्षाचा १९३९ अखेरचा वार्षिक जमाखर्च व ताळेबंद प्रसिद्ध झाला असून तो आमचेकडे माहितीकरितां आला आहे. कंपनीनें गोळा केलेल्या भांडवलाची दर्शनी किंमत एक लाखापेक्षा जास्त असून त्यापैकीं चाळीस टक्के एवढेंच भांडवल मागविण्यांत आलें असून बाकी येणें राखून ठेवलें आहे. अहवालावरून कंपनीच्या प्रगतीची कल्पना येते. १९३९ मध्यें कंपनीनें एकूण रु. ४,०७,५९० रुपयांचे विमे स्वीकारले. कंपनीचें विमा हप्त्याचें उत्पन्न रु. ७०,६५९-७-० व विमानिधि रु. ४८,७०६-५-५ पर्यंत गेला आहे. कंपनीनें रु. ४६,९०० येवढी रकम सरकारांत भरून नवीन विमा-कायद्याच्या मुख्य कलमाची पूर्तता केली आहे. अहवालाचे सालीं कंपनीनें आपलें कार्यक्षेत्र इंदूर, दिल्ली, व हैद्राबाद ( दक्षिण ) येथपावेतों वाढविलें आहे. दैनिक हप्त्याच्या योजनेचा प्रसार या कंपनीनें मोठ्या प्रमाणावर केला आहे. पहिल्या मूल्यमापनांत विमेदारांस हजारी रु. ३० व २६ असा त्रैवार्षिक नफा देण्यांत आला असून भागीदारांस २॥ टक्के व्याज वाटलें आहे. प्रतिकूल परिस्थिति व चढाओढ आणि जागतिक मंदी व महायुद्धामुळें झालेली महर्गता यांचा विचार करतां कंपनीचें यश समाधानकारक आहे, हें दिसून येईल. कंपनीच्या मॅनेजिंग एजंटांनीं स्वार्थत्यागपूर्वक चालविलेलें काम उल्लेखनीय असून, त्यांच्या परिश्रमास योग्य तें फळ येत असल्याचें अहवालावरून स्पष्ट होत आहे. कंपनीची शीघ्र गतीनें भरभराट होईल, अशी आशा आहे.

---

### दि सदर्न निटिंग वर्क्स लि.

वरील कंपनीची वार्षिक सभा रविवार ता. ७ रोजीं भरली होती. कंपनीस १९३९ च्या हिशेबांत सर्व खर्च जाऊन, ठेवीदारांचें व्याज देऊन आणि मॅनेजिंग एजंट्सचें सुमारें ३१ हजार रुपये कमिशन वजा घालून भागीदारांस वाटतां येईल असा सुमारें ७ हजार रुपयांचा नफा उरला, त्यांतून भागीदारांस ६% दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें आणि १½ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले. कंपनीच्या कारखान्याचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे, अविक्रुत भाग भांडवल खपत आल्यामुळें तें ३ लाखांनीं वाढवावें लागलें आहे, ठेवींच्या रकमेंत चांगली वाढ होत आहे, मध्यम वर्गांतील स्त्रियांस कारखान्यांत काम देण्याचा प्रयोग यशस्वी ठरत आहे, कारखान्यांत नवीन यंत्रसामुग्रीची वाढ करण्यांत आली आहे, फॅक्टरींत तयार होणाऱ्या मालास परदेशांतून मोठी घाऊक मागणी येत आहे, वगैरे माहिती सभेंत सांगण्यांत आली. श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी; श्रीमंत ग. वि. साळवेकर, मुंबई व श्री. रा. ग. कुबेर, ॲडव्होकेट, सातारा ह्यांची बोर्डावर फेरनिवड झाली. सदर्न निटिंगच्या कारखान्याची प्रगति चांगल्या रीतीनें होत आहे, हें डायरेक्टरांच्या रिपोर्टावरून दिसून येतें.

---

आपण रेडिओ, मोटार किंवा टाइपरायटर यांचे विक्रेते असाल. आम्ही आपणास विमा-विक्रीचीं सूत्रें सांगूं. आपण चालू उत्पन्नांत भर घालालच; परंतु त्याबरोबरच पुढील उत्पन्नाचीहि तरतूद करूं शकाल.

आपल्या ग्राहकांस एक सुंदर पंचांग मोफत दिलें जातें. नाणें टाकलें तरच हें पंचांग चालतें. अशा तऱ्हेनें पंचांग चालू राहून हप्ता गोळा होईल आणि आपणांस कमिशन मिळेल. लिहा :

दी ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स
कंपनी लि., पुणे.

# दारूबंदीच्या प्रयत्नांतील अडचणी

## मुंबई हायकोर्टाचे निर्णयामुळें उपस्थित झालेली परिस्थिति

### प्रकरणाचा पूर्वेतिहास

१७ जुलै, १९३९ रोजीं मुंबई सरकारनें अबकारी ॲक्टाच्या १४ ब (२) ह्या कलमाखालीं एक जाहीरनामा काढून मुंबईचे हद्दींत कोणीहि दारू जवळ बाळगणें बेकायदा असल्याचें जाहीर केलें. पुढें १९४० च्या प्रारंभीं सदरहू कलमाचा भंग केल्याबद्दल चौघांवर खटले भरण्यांत आले, त्यांत ते दोषमुक्त ठरले. ह्या निवाड्यावर सरकारतर्फे अपील करण्यांत आलें, परंतु हायकोर्टानें खालील कोर्टाचा निवाडा कायम केला आणि अबकारी ॲक्टाच्या वरील कलमाप्रमाणें सरकारनें काढलेले जाहीरनामे बेकायदा ठरविले. मुंबई सरकारच्या दारूबंदीच्या कार्यक्रमास विधिमंडळाची संमति होती, तरी विधिमंडळाच्या कायद्याच्या स्वरूपांत सरकारास ती मिळाली नव्हती. एकाद्या व्यक्तीस अगर कांहीं व्यक्तींच्या विशिष्ट गटास जवळ दारू बाळगण्यास अबकारी कायदा प्रतिबंध करूं शकेल, परंतु सर्वसाधारण जनतेस तो प्रतिबंध करूं शकणार नाहीं, अबकारी ॲक्टाचा पूर्ण दारूबंदी करण्याकडे उपयोग करणें कायद्याच्या उद्देशास धरून दिसत नाहीं, असा आपला अभिप्राय हायकोर्टानें व्यक्त केला. हायकोर्टाचा निवाडा जाहीर झाल्यानंतर लागलीच गव्हर्नरांनीं दारूबंदीची पूर्वस्थिति कायम राखण्यासाठी एक खास कायदा जाहीर केला. १९ एप्रिल १९४० रोजीं एक मनुष्य बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेच्या दादर स्टेशनवर उतरला, त्यावेळी त्याचेजवळ देशी दारूची एक बाटली सापडली त्यांत १½ ड्रॅम दारू होती. त्याचेवर अबकारी कायद्याच्या ४३ कलमा खाली खटला भरण्यांत आला. ॲक्टाखालील एका नियमाचा भंग केल्याचा त्याचेवर आरोप ठेवण्यांत आला. हा खटला प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मि. संबाटा, ह्यांचेपुढें सुनावणीस निघाला, परंतु त्यांनीं खटल्यांतील महत्त्वाच्या मुद्यासंबंधीं हायकोर्टाकडे विचारणा केली त्याचा विचार करून हायकोर्टानें निवाडा केला, आणि तो प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटकडे पाठविला. हायकोर्टाचा निवाडा खालीलप्रमाणें आहे:—

### हायकोर्टाचा निवाडा

ह्या दाव्यांत दोन मुद्दे निघाले: (१) सबंध मुंबई प्रांतांत अगर त्याचे कांहीं भागांत पूर्ण दारूबंदी अमलांत आणणारा कायदा ३१ व्या सदरान्वयें प्रांतिक विधिमंडळास मंजूर करतां येतो काय? आणि, (२) मुंबईत पूर्ण दारूबंदी करणारा एकादा प्रभावी कायदा अमलांत आहे काय? म्हणजे, हायकोर्टानें १७ जुलै, १९३९ रोजीं बेकायदा ठरविलेला जाहिरनामा त्याच दिवशीं गव्हर्नरांनीं दुरुस्त कायदा जाहीर करून पूर्ववत् कायदेशीर ठरविला, त्याचा आज अंमल कायद्यास धरून आहे काय? पहिला मुद्दा महत्त्वाचा नाहीं. परंतु जाहिरनाम्याविरुद्ध दोन आक्षेप घेण्यांत आले. (१) दुरुस्त कायद्याच्या ७ व्या कलमाचे कक्षेंत प्रस्तुत जाहीरनामा येत नाहीं, आणि (२) तसा तो आल्यास, जाहीरनामा बेकायदा ठरविल्यावर त्याचा आधार घेऊन आरोपीस शिक्षा देतां येणार नाहीं.

दुरुस्त कायद्याच्या ७ व्या कलमाचे कक्षेंत जाहीरनामा आला तर दुरुस्त कायदा अंमलांत येण्यापूर्वी कायदेशीर असलेलीं कृत्यें बेकायदा ठरतील. हायकोर्टाचें मतें हा जाहीरनामा ७ व्या कलमाचे कक्षेंत येत नाहीं. ज्यां दिवशीं दुरुस्त कायदा करण्यांत आला, त्या दिवशीं चालू असलेले जाहीरनामेच त्या कायद्याचे चौकटींत बसतील, जे जाहीरनामे त्या दिवशीं अंमलांत नव्हते, त्यांचा प्रश्नच उद्भवत नाहीं. दुसऱ्या मुद्याचा विचार करतां, कोर्टानें गैर ठरविलेला जाहीरनामा बेकायदा बनल्यावर त्याचे आधारानें लोकांस वागण्यास मुभा असते आणि ७ व्या कलमानें बेकायदा जाहीरनाम्याचें पुनरुज्जीवन होऊं शकत नाहीं. कोर्टानें दिलेला कायद्याचा अर्थ बदलण्याचा अधिकार फक्त विधिमंडळाच्या ॲक्टासच आहे. प्रस्तुत जाहीरनामा अंमलांत नसल्याचें कोर्टानें जाहीर केल्यानंतर आणि त्याचें पुनरुज्जीवन केलें नसल्याकारणानें त्यासंबंधांत कोणावरहि फिर्याद करतां येणार नाहीं.

### मध्यवर्ती सरकारच्या अधिकाराचें अतिक्रमण

दारूबंदीचेबाबत कायदा करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस आहे, मात्र तो उपयोगांत आणतांना मध्यवर्ती सरकारचे अधिकारावर आक्रमण होतां कामा नये. "फेडरल सरकारनें ठरविलेल्या कस्टम्सच्या सीमेवरून (एक अगर अधिक, पाण्याची अगर जमिनीची) होणारी आयात व निर्गत मध्यवर्ती सरकारचे कक्षेंत येते. मुंबईच्या पाण्याच्या सीमेवरील दारूची आयात-निर्गत मध्यवर्ती सरकारचे नियंत्रणावरील बाब आहे. अर्थातच दारू बाळगल्यामुळें कस्टम्सच्या सीमेवरून दारू आयात अगर निर्यात करण्यास अडचण पडली तर ती दारू बाळगणें बेकायदा ठरविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस नाहीं. अबकारी कायद्याचें १४ ब (१) हें कलम प्रांतिक सरकाराचे परवान्यावाचून अशी नेआण करणें बेकायदा करूं पहात आहे, परंतु प्रस्तुत दाव्यांत त्याचा प्रश्न उपस्थित होत नाहीं. १४ ब [२] कलमाखालील दारूबंदीचा अधिकार अंमलांत आणतांना मध्यवर्ती सरकाराच्या अधिकाराचें अतिक्रमण होतां कामा नये. १७ जुलै १९३९ चा जाहीरनामा प्रभावी समजल्यास, मुंबईच्या समुद्राचे सीमेवरून दारूची आयात अगर निर्गत करणें बेकायदा ठरेल अगर तसें करण्यापूर्वी प्रांतिक सरकाराचा परवाना घ्यावा लागेल. हा परवाना देण्यास प्रांतिक सरकार बांधलेलें नाहीं. दारूबंदी अंमलांत आणण्याचा प्रांतिक सरकारचा अधिकार मध्यवर्ती सरकारच्या अधिकारानें मर्यादित केलेला आहे. संपूर्ण दारूबंदी केल्यास मुंबईच्या समुद्रसीमेवरून दारूची आयात–निर्गत करतां येणार नाहीं आणि मुंबई हें तर ब्रिटिश हिंदुस्थानाचें प्रमुख बंदर आहे. सबब, १७ जुलै १९३९ चा जाहीरनामा अंमलांत आहे असें मानलें तरी तो प्रांतिक सरकाराचें अतिक्रमण करीत असल्याकारणानें बेकायदा ठरेल, असें हायकोर्टाचें मत आहे."

फेडरल कोर्टाकडे अपील करावयासाठी सर्टिफिकेट मागावयाचें किंवा नाहीं हें ठरविण्याकरितां सरकारी ॲडव्होकेट जनरलनीं हायकोर्टाकडून मुदत मागून घेतली.

### निवाड्यानंतर

हायकोर्टाचा निकाल जाहीर होतांच सरकारच्या एक्साइज खात्याच्या अधिकाऱ्यांस सूचना दिली कीं, त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच परवाना असणारांसच नियंत्रित दारूविक्री करावी; दारूबंदी उठली

असें त्यांनीं समजून वागूं नये. गव्हर्नरांचे सल्लागार, मि. नाईट, ह्यांनीं कायद्याच्या सरकारी सल्लागारांचा सल्ला घेण्यास प्रारंभ केला. ज्या मूळ खटल्यामुळें हायकोर्टाचा निकाल मिळाला, तो खटला गुरुवार, ता. ४ रोजीं प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत सुनावणीस निघाला; त्यावेळीं आरोपीस दोषमुक्त ठरवून सोडून देण्यांत आलें. ह्यापुढे मुंबई, अहमदाबाद आणि भडोच येथें कोणासहि विलायती दारू मिळूं शकेल; परवान्याची आवश्यकता नाहीं. देशी दारूच्या विक्रीसंबंधीं नवीन हुकूम अद्याप सोडण्यांत आलेले नाहींत, दारूबंदीबाबत सरकारचा अखेरचा निर्णय लवकरच जाहीर होईल अशी अपेक्षा आहे. कॉंग्रेस सरकारनें अमलांत आणलेल्या दारूबंदीच्या धोरणास मिळालेला सार्वत्रिक पाठिंबा लक्षांत घेतां, तें धोरण सैल करणें इष्ट होणार नाहीं, असें माजी मुख्य प्रधान श्री. खेर, हे एका मुलाखतींत म्हणाले. दारूच्या धंद्यांशी हितसंबंध असलेल्यांनीं आणि दारूच्या निस्सिम भक्तांनीं अर्थातच हायकोर्टाच्या निवाड्याचें मनःपूर्वक स्वागत केलें आहे.

---

### न्यूझीलंड

कॅनडा, ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका ह्या ब्रिटिश वसाहतींचे प्रमाणें न्यूझीलंड युद्धाचे संबंधांत मोलवान सहाय देत आहे. ह्या वसाहतींत संपत्तीचीं नैसर्गिक साधनें विपुल असून लोकसंख्या अल्प असल्यामुळें तीं संपन्न आहेत. निसर्गाचा पूर्ण उपयोग करण्यास आवश्यक असलेलें मनुष्यबळ त्यांचेपाशीं नसल्यानें ग्रेटब्रिटन-मधून कुटुंबें तेथें जाऊन कायम वस्ती करून रहावीं ह्याविषयीं मार्गे खटपट झाली आहे. कॅनडा, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड ह्या वसाहती ग्रेटब्रिटनला माणसें व सामुग्री ह्यांचे बाबतींत सहाय देण्याची शिकस्त करीत आहेत, हें वेळोवेळ प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांवरून स्पष्ट होत आहे. ब्रिटिश वसाहतींपैकी न्यूझीलंड हा देश घेतला तर असें दिसून येतें कीं, त्याची लोकसंख्या फक्त १६ लक्ष आहे, परंतु त्याचें एकूण सांपत्तिक उत्पादन दर वर्षांचे सरासरीनें १७५ कोटि रुपये आहे. दरमाणशी उत्पन्नांत न्यूझी-लंडचा जगांत जवळजवळ उच्चांक आहे असें म्हटलें तरी चालेल दरमाणशीं वार्षिक उत्पादन एक हजार रुपये इतकें होतें हें न्यू-झीलंडच्या संपन्नतेचें निदर्शक आहे. वसाहतीच्या संपत्तीमध्यें शेती, दूध, कोंबड्या व लोकर ह्यांचे संबंधांतील उत्पादनाचा अंश फार मोठा आहे. कारखान्यांतलें उत्पन्न ह्या मानानें बरेंच अल्प आहे. नैसर्गिक व सामाजिक परिस्थितीच्या दृष्टीनें वसाहतीच्या आर्थिक परिस्थितीचें हें स्वरूप सहाजिक आहे.

---

### " ट्रस्ट ऑफ इंडिया "चे नवीन डायरेक्टर

या संस्थेच्या विमेदारांची वार्षिक सभा कंपनीच्या मुख्य कचेरींत रविवार ता. १६ जून १९४० रोजीं होऊन विमेदारांतर्फे कंपनीच्या संचालक मंडळावर पुढील चार प्रतिनिधींची निवड करण्यांत आली.

(१) बॅरिस्टर खासगीवाले, पुणें.
(२) श्री. एस. आर. मोढे, अमरावती.
(३) श्री. व्ही. एन. भोळे, ठाणें.
व (४) श्री. आर. व्ही. कुलकर्णी, पुणें.

भागीदारांची सभाही त्याविवशीं होऊन (१) सर मोरोपंत जोशी, (२) खानसाहेब एच. डी. चीनाय व (३) श्री. एल. आर. मोडक हे भागीदारांतर्फे पुन्हा निवडून आले.

बॅरिस्टर खाजगीवाले हे विमेदारांतर्फे डायरेक्टर म्हणून निवडून आल्यामुळे त्यांचे जागीं भागीदारांतर्फे डायरेक्टर म्हणून डॉ. व. रा. साने यांचें नांव सुचविण्यांत आलें आहे.


स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

बंगला विकणें आहे! आधुनिक सुखसोयींनीं सुसज्ज असा, दरसाल ३०० तीनशें रु. भाडें येणारा नुकताच बांधलेला कराड येथील बंगला विकणें आहे! किंमत फक्त ५००० रु. पैसे गुंतविणारांना अमूल्य संधि! विशेष माहितीपत्रकासाठीं पोस्टाचें ०१ एक आण्याचें तिकिट ठेवून पत्रव्यवहार करावा.
पत्ताः—डी. बी. जोशी, मोटार प्रोप्रायटर.
मु० पो० कऱ्हाड, जि० सातारा.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ६
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड,
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.
किं. १ रु. ८ आणे
१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.
: लेखक :
प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे
बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें
अत्यंत उपयुक्त पुस्तक
" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

# दी ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

या संस्थेच्या भागीदारांची वार्षिक सभा रविवार ता. १६ जून १९४० रोजीं कंपनीच्या मुख्य कचेरींत भरली होती. त्यावेळीं कंपनीचे अध्यक्ष श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंढीत यांनीं केलेलें भाषणः—

### नवीन काम

"३१ डिसेंबर १९३९ पर्यंतच्या वर्षाचा बॅलन्सशीट व रेव्हिन्यु अकौन्ट हा हिशेब तपासनिसांच्या शिफारशीसह तुम्हापुढें ठेवण्यास संचालक मंडळास फार आनंद होत आहे. अहवालाच्या सालीं एकूण ४,०७,५२० रुपयांच्या ७०४ पॉलिसीज देण्यांत आल्या. कंपनीच्या वाढत्या भरभराटीची कल्पना आपणांस खालील कांहीं तुलनात्मक आकड्यावरून येण्यासारखी आहे. १९३७ सालीं कंपनीनें ३,०६,८२५ रुपयांचें काम पूर्ण केलें, त्यावेळीं हप्त्यांची मिळकत रु. २३,३९१/१०/६ होती, व विमानिधी रु. ७,३१५/१२/० होता. १९३८ सालीं कंपनीनें ३,७४,९३८ रुपयांचें काम पूर्ण केलें त्यावेळीं रु. ४५,००४/७/० ही हप्त्यांची मिळकत झाली व विमानिधी रुपये ३७,८०१/१४/१ पर्यंत वाढला. अहवालाच्या सालीं काम रु. ४,०७५२० चें पूर्ण झालें असून हप्त्यांची मिळकत रु. ७०,६५७/६/० झालेली आहे व विमानिधी रु. ४८,७०६/५/५ पर्यंत वाढला आहे.

### खर्च

"एकूण अहवाल पहातां असें निश्चयानें म्हणतां येईल कीं कंपनीनें हप्त्यांची मिळकत, विमानिधी व पॉलिसीची दर्शनी किंमत अशा सर्वांगानें चांगलीच प्रगति केली आहे. संचालक मंडळानें व्यवस्था-खर्च किमान राखला आहे. जरी खर्चाचें प्रमाण हें पूर्वीपेक्षा अहवालाच्या सालीं जरा वाढलेलें दिसत असलें तरी हा खर्च कंपनीनें आपल्या मूल्यमापनांत जें निर्दोश यश संपादन केलें तें जाहीर करण्यांत झाला आहे. शिवाय मूल्यमापनाची फी इत्यादी खर्चही जादा झाला. तसेंच नवीन विमा-कायद्याच्या पूर्तते करतांही थोडा खर्च होणें अपरिहार्य झालें. तथापि आम्हांस असा विश्वास वाटतो कीं, पुढील मूल्यमापनापर्यंत म्हणजे येत्या दोन वर्षांत खर्चाचें प्रमाण बरेंच कमी होईल. प्राथमिक खर्च व कामाचा प्रसार याकरतां दाखविलेली खर्ची रक्कम कमींत कमी ठेवण्याचा आमचा इरादा आहे व त्याप्रमाणें अहवालाच्या सालीं आम्हीं रु. ९९०/३/११ नीं ती सर्व रक्कम कमी केली आहे.

### अनामत

"रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कलकत्ता, कडे एकूण डिसेंबर अखेर पर्यंत रु. ८६,२०० एवढी रक्कम (रु. ७३,७०० दर्शनी किंमतीच्या सिक्युरिटीज् व रु. १२,५०० रोख) अनामत ठेवण्यांत आली आहे. अशा रीतीनें नवीन विमाकायद्याचें मुख्य कलम आम्हीं पूर्ण केलें आहे.

### कामाचा प्रसार

"अहवालाच्या सालीं कंपनीनें इंदोर, ग्वाल्हेर, हैद्राबाद (दक्षिण) आणि दिल्ली येथपावेतों आपले कामाचें क्षेत्र वाढविलें आहे व तेथून चांगल्या प्रमाणांत काम येत राहील असा आम्हांस विश्वास वाटतो.

"ज्या ज्या ठिकाणीं कंपनीच्या शाखा आहेत अशा ठिकाणीं स्थानिक संचालक मंडळें नेमण्यांची आमची मनीषा आहे. त्याअन्वयें विमेदारांच्या सोयीकडे पूर्णपणें लक्ष पुरवितां येईल व कंपनीचा प्रसार वाढविण्यासही उत्तम मदत होईल. शेवटीं कंपनीचा झालेला उत्कर्ष सांगत असतां कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, एजन्सी इन्स्पेक्टर्स व मॅनेजिंग एजन्टस् आणि कामगार यांचा मी आनंदानें उल्लेख करतों. त्याचप्रमाणें संचालक मंडळावरील बाकीच्या सभासदांनीं मला जें सहाय्य दिलें त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों."

---

## मुंबई प्रांतांत शेतीसुधारणेचे प्रयत्न

शेतीच्या धंद्याचें उत्पन्न वाढून शेतकऱ्यांच्या मिळकतींत भर पडण्यासाठीं निरनिराळीं पिकें आणि जनावरें ह्यांचे संबंधांत शास्त्रीय संशोधन होण्याचें महत्त्व किती आहे हें सांगावयास नको. ह्या संशोधनांतून निघणाऱ्या सुधारणांविषयींच्या कल्पनांस मूर्त स्वरूप देणें सामान्य शेतकऱ्यांस परवडलें पाहिजे आणि त्यांच्या हातून घडलें पाहिजे यांत शंका नाहीं. तथापि, सुधारलेल्या जातींचें बीं-बियाणें, खतें व जनावरें ह्यांचे संबंधांत आजवर झालेल्या संशोधनाचा प्रत्यक्ष रीतीचा व्यावहारिक उपयोग झालेला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ह्या कामीं हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें व सहायानें इंपीरिअल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च महत्त्वाची कामगिरी करीत आहे आणि प्रांतिक सरकारांच्या सहकार्यानें ती फलद्रूप होत आहे.

मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याच्या १९३८-३९ सालच्या वृत्तांतांत ह्या बाबतींत तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे, तीवरून शास्त्रीय संशोधनाचें कार्य त्याच्यामार्फत शेतीच्या कोणत्या निरनिराळ्या क्षेत्रांत चाललें आहे, ह्याची कल्पना येते. ह्या प्रांतांत ग्रामसुधारणेचा नवीन कार्यक्रम जिल्हानिहाय आखला गेल्याकारणानें शेतीच्या खात्याच्या कार्याच्या व्यापामध्यें बदल झाला असला तरी संशोधनाचें विविध प्रकारचें काम त्याच्या विद्यमानें चाललें आहे.

शेतीची जमीन आणि कालव्याचें पाणी ह्या विषयींच्या संशोधनांत प्रगति होत आहे आणि उसाच्या पिकाचे दृष्टीनें त्याचा उत्कृष्ट उपयोग होईल. कोरडवाहू जमिनींत ओलाव्याचें रक्षण करून त्यांतील पिकाची वाढ करण्याबाबततीत सोलापूर व विजापूर येथें प्रयोग चालू आहेत आणि ते यशस्वी ठरले आहेत. उच्च जातीची कपास निर्माण व्हावी म्हणून सुरत, विरमगांव, जळगांव, धारवाड इत्यादि ठिकाणीं संशोधन चाललें आहे. भात, गहू, बाजरी, ज्वार, तंबाखू ह्या पिकांच्या सुधारणेबाबतच्या प्रयत्नांचीहि प्रगति होत आहे. चांगल्या जातींच्या जनावरांची पैदास ही संशोधन व प्रयोग ह्यांचे संबंधांत महत्त्वाची बाब आहे आणि तिचेकडे शेतीच्या खात्याचें पूर्ण लक्ष आहे. सुधारलेलें बीं व शेतीचीं साधनें ह्यांचा उपयोग शेतकऱ्यांचे नजरेस आणण्याचें काम जिल्ह्यांमध्यें नवीन स्थापन झालेल्या ग्रामसुधारणा खात्यावर सोपवण्यांत आलें आहे. चांगलें बीं वाढवणें व शेतकऱ्यांमध्यें वाटणें हें काम इतर देशांत बिन सरकारी संस्था करतात. हिंदुस्थानांत तें कार्यहि सरकारच करतें. पिकांच्या सुधारलेल्या जातींचें महत्त्व आतां शेतकऱ्यांस पटलें आहे, आणि त्यांच्या बियाची मागणी शेती खात्याकडे वाढत्या प्रमाणांत होत आहे. खात्याचे अधिकारी निरनिराळ्या अनेक ठिकाणीं शेती सुधारणेविषयीं प्रत्यक्ष माहिती देत असतात.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... ... | १०७—५ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ८६—५ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | ९८-१४ |
| ३% (१९६३-६५) ... ... ... | ८५—९ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९२—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | ९८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | ९७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) ... ... | १०६—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | ११६—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा मामाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १३०—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ९२—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ४% ... | ३२—८ |
| इंपिरियल बँक (५००) १२% ... ... | १४३५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | ९९—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४०-११-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३—०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% ... ... | १२४—८ |
| कराची (१००) ९% ... ... ... | ११८-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | १८२—२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १२८७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १४५०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४½% ... ... | ९५—८ |
| पाचोरा-जामनेर (१००) २% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८०—० |
| तापी व्हॅली (५००) ७½% ... ... ... | ७८०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. ... ... ... | २०२—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. ... ... | ४४—८ |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | १८—५ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ... | ३८—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ३५००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २०५-१० |
| टाटा आयर्न द्वु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. ... | १४३-१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३३७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १७५०—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | ११३—० |

### एल्जिन मिल्स कं. लि.

वरील कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ३२ लक्ष रुपये असून गंगाजळींत २३ लक्ष रुपये, १० लाखांचीं डिबेंचर्स, देणीं ४४ लक्ष, ८३ हजार रुपये आणि नफा-तोटा खातीं २ लक्ष, ३ हजार रुपये, अशा बाबीं देणें बाजूस असून जिंदगीचे बाजूस ५ लक्ष रुपयांच्या इमारती, यंत्रें वगैरे, ४० लक्ष रुपयांचा स्टोर्स इ., ४६ लक्ष रुपयांचा तयार माल, ५½ लक्ष रुपयांचीं येणीं, ८½ लक्ष रुपये रोख आणि गुंतविलेले, वगैरे बाबी आहेत. मेसर्स बेग, सदर्लंड आणि कं. ह्यांचेकडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

### मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स ॲण्ड इण्डस्ट्रीज, पुणें २

#### सहावी वार्षिक सभा

चेम्बरची सहावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार ता. १४ जुलै १९४० रोजीं सायंकाळीं ५ वाजतां केसरी-मराठा कचेरीच्या सभागृहांत होणार आहे. सभेंत चेम्बरच्या सहाव्या वर्षाच्या कार्याचा अहवाल सादर करावयाचा असून पुढील साला करितां कार्यकारी मंडळ नेमणें वगैरे कामें व्हावयाचीं आहेत.

ता. ५-७-४० }
आ. रा. भट
गो. कृ. आपटे
संयुक्त-कार्यवाह.


# पैसा फंड ग्लास वर्क्स

## तळेगांव (दाभाडे)

कारखान्यांत पूर्वींचा माल चिमण्या, बांगड्या, पेपरवेटस्, चिनीमातीच्या बरण्या, वगैरे मिळत असून नवीन इलेक्ट्रिक शेडस् व ग्लोबस् मिळतात.

कॅटलॉग व माहिती मागवा.

सुपरिंटेंडन्ट
पैसा फंड ग्लास वर्क्स, तळेगांव.

## कांहीं खेडेगांवी धंदे

(१)

पूर्वी चालू असलेल्या धंद्यांचें पुनरुजीवन करून व शक्य असतील ते नवीन धंदे सुरू करून खेडेगांवांतील बेकारीला आळा घालण्याची योजना १९३९-४० सालाकरितां मुंबई सरकारनें आखली होती. त्याप्रमाणें तेल गाळणें, कागद-बटणें करणें, ताडी-शिंदीच्या रसापासून गूळ व चटया तयार करण्याचें शिक्षण देण्यासाठी शिक्षणकेंद्रें उघडण्यांत आलीं. त्यांची थोडक्यांत माहिती पुढीलप्रमाणें आहे.

### तेल गाळणें व कागद तयार करण्याचा धंदा

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या वर्धा येथील शाळेंत शिक्षण घेण्याकरितां विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याकरितां मुंबई सरकारनें रु. २,२५० मंजूर केले. कागद तयार करण्याचें शिक्षण १० व तेल गाळण्याचें शिक्षण ४ विद्यार्थ्यांनीं घेतलें.

हातानें कागद तयार करण्याच्या धंद्याला उत्तेजन देण्यासाठी सरकारनें रु. १,७४६ खर्च केले. एरंडोलच्या पांच व जुन्नरच्या दोन कारखान्यांची डागडुजी करण्यांत रु. १,५२० खर्च झाले. होनावर येथें रु. २०० खर्च करून धंद्यास नवीनच सुरवात करण्यांत आली असून अधिक मदत कांहीं काळ केल्यास तेथें कागदाचा धंदा किफायतशीर होईल अशी आशा आहे. बागलकोटला कागद तयार करण्याच्या प्रयत्नांस आवश्यक सहानुभूति न मिळाल्यानें यश आलें नाहीं. हरिजन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याकरितां भडोच लोकलबोर्डाच्या शिफारसीवरून रु. २०० देण्यांत आले. परंतु १ जानेवारी १९४० पासून भडोचचें शिक्षणकेंद्र बंद करण्यांत आलें. मुंबई सरकारनें कागद तयार करण्याच्या धंद्यावर एकूण रु. २,४४२ खर्च केले.

जुन्नर व एरंडोल येथून १९३९-४० मध्यें सरकारास रु. ९,८९४ चे टिपकागद व रु. ३,६९५ चे पांढरे कागद पुरविण्यांत आले.

हातानें कागद करण्याच्या धंद्याचें शिक्षण देण्यासाठी मुंबई सरकारनें रु. २१,५०० प्राथमिक खर्चाकरितां व रु. १०,१४० प्रतिवर्षी देण्याकरितां मंजूर केले आहेत. अशा तऱ्हेचें शिक्षण देण्याकरितां पुण्यांतील शेतकी कॉलेजच्या नजीक एक शिक्षण-केंद्र उघडण्यांत आलें आहे. संस्थेची इमारत बांधून पुरी झाली असून श्री. के. बी. जोशी यांच्या नेतृत्वाखाली कामास लवकरच सुरवात होईल. अखिल भारतीय ग्रामोद्योग संघांत वर्ध्याला श्री. जोशी यांनीं काम केलें असून कागद हातानें तयार करण्याच्या धंद्यांत ते तज्ज्ञ आहेत.

### बटणें तयार करण्याचा धंदा

होनावर येथील औद्योगिक शाळा पूर्वीपासून चालू असून त्यांत बटणें तयार करण्याचें खातें आहे. पूर्वीच्या अनुभवास धरूनच १९३९-४० मध्यें बटणें तयार करण्यांत आलीं. बटणें वाकूं नयेत व दिसावयास चांगलीं दिसावीत म्हणून निरनिराळ्या रंगांचा प्रयोग करण्यांत येऊन त्या कांहींत यशहि आलें आहे. लाखेचीं बटणें बाजारांत चांगलीं खपतात; म्हणून तीं तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. चालू वर्षांत एकूण १७ नवीन इसमांना धंदा शिकविण्यांत आला. शिकलेल्यांपैकी ११ जण होनावर शहरांत स्वतंत्र धंदा करून पोट भरीत आहेत. या खात्यावर ४५० रुपये खर्च करण्यांत आला, बटणें विकून रुपये ४६ जमा झाले.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कॅंटब), बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रॅंच ऑफिस–लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस–जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१। आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी ' कुशाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.